# मिरा भाईंदर महानगरपालिका

**सामान्य प्रशासन विभाग**

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी gad@mbmc.gov.in


"माझे शहर, माझा अभिमान"

जा.क्र. मनपा/सा.प्र./३८६ /२०२६-२७ दि.२४/०९ /२०२६

## // परिपत्रक //

कळविण्यांत येते की, **मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६** रोजी **पंडित दीनदयाळ उपाध्याय "रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र"** या रोजगार महाकुंभचे उद्‌घाटन **मा.श्री. देवेंद्र फडणवीस जी, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते व मा.श्री. एकनाथ शिंदे जी, उपमुख्यमंत्री व मा.श्रीम. सुनेत्रा पवार जी, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य** यांचे उपस्थितीमध्ये होणार असल्याचे कळविले आहे. सदर रोजगार मेळावा मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सकाळी ०९.०० वा. धम्म सम्राट अशोक बुध्द विहार व विपश्यना केंद्र, रामदेव पार्क, मिरारोड पुर्व येथे आयोजित करण्यात आलेला आहे. तसेच सदर कार्यक्रम **मा. महापौर श्रीम. डिंपल विनोद मेहता,** मा. उपमहापौर श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील व मा. आयुक्त श्री. राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) तसेच मा. स्थायी समिती सभापती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता, मा. महिला व बालकल्याण समिती सभापती व उपसभापती, मा. सभापती प्रभाग समिती क्र. १ ते ६, मा. सभापती पाणी पुरवठा व मलनि:सारण समिती, मा. सभापती शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समिती, मा. सभापती आरोग्य व वैदयकीय आरोग्य, पर्यावरण, उदयान व शहर सुशोभिकरण समिती, मा. सभापती समाज कल्याण व झोपडपट्टी सुधार समिती, मा. सभापती परिवहन, मा. अध्यक्षा रौप्य महोत्सवी वर्ष समिती, मा. नगरसेवक / नगरसेविका (सर्व), मा. पदाधिकारी (सर्व), मा. पत्रकार वर्ग तसेच सर्व प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये आयोजित करण्यात आलेला आहे.

तरी सदर रोजगार मेळाव्यास सर्वांनी वेळेत उपस्थित रहावे. ही विनंती.

**(डॉ. सचिन बांगर)**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**